http://www.epitomejournals.com, Vol. 2, Issue 12, October 2016, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# आदिवासी विकास आणि नक्षलवाद चळवळ



**प्रा. डॉ. संभाजी कोंडीबा फोले**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग
वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय, औरंगाबाद
E-mail : sambhajiphole@gmail.com

## Abstract :

भारतीय समाजव्यवस्थेत आदिवासी समाज हा सगळ्यात जास्त मागासलेला समाज आहे. आदिवासी समाजात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आरोग्य विषयक अशा अनेक समस्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी शासन स्तरावर अनेक प्रयत्न केले गेले. स्वतंत्रपणे आदिवासी विकास मंत्रालय आणि विभागाची स्थापन केली गेली. या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासींच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने अनेक कल्याणकारी कार्यक्रम व योजना राबविण्यात येत आहेत. त्यावर दरवर्षी कोट्यावधी रूपये खर्च करण्यात येतो; परंतु आजपर्यंत आदिवासी समाजाचा विकास झाल्याचा आपणास दिसून येत नाही. शासनाच्या योजना, कार्यक्रम आदिवासींपर्यंत जातच नाहीत. त्या फक्त कागदावर दाखविल्या जातात. आदिवासी विकास योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो. त्यामुळे आदिवासी विकासाची गती अत्यंत मंद गतीने होत असल्याचे दिसून येते. आदिवासी समाज सर्व बाजूंनी नाडला जात आहे. कारण सर्व बाजूंनी आदिवासी समाजावर अन्याय, अत्याचार होत आहे. हा समाज दुर्गम स्वरूपाच्या डोंगराळ भागात विस्तारल्यामुळे आणि निरक्षरता, नेतृत्त्वहीनता, रूढी परंपरा यामुळे अन्याय, अत्याचाराविरूद्ध आवाज उठविण्यासाठी प्रभावी असा अशा संघटना नाहीत. त्यामुळे हा समाज विकासाच्या प्रवाहापासून फार दूर राहिलेला आहे.

**Keywords :** भारतीय समाज, आदिवासी विकास, नक्षलवाद चळवळ, रूढी, समस्या

 *©EIJMR, All rights reserved.*

## Research paper :

आदिवासींवर होणा-या अन्याय, अत्याचाराला तोंड देण्यासाठीच इ.स. १९६७ मध्ये बंगालमधील नक्षलबारी गावात नक्षलवादी चळवळीचा उदय झाला. ही चळवळ मार्क्सवाद, लेनिनवाद या कम्युनिस्ट विचार श्रेणीवर आधारित होती. पहिल्यांदा या चळवळीचा उद्देश, हेतू चांगला होता; परंतु नंतर त्यामध्ये मतभेद होऊन अनेक वेगवेगळ्या विचारांचे गट निर्माण झाले. त्यातून नक्षलवादी चळवळीला वेगळे वळण लागले आणि त्या चळवळी हिंस्र घातपात घडविणा-या होऊन गेल्या आणि आदिवासींच्या विकासाऐवजी आपल्या स्वार्थासाठी आदिवासींच्याच जीवावर उठल्या. या नक्षलवादी चळवळींनी हिंस्र, रक्तपात, घातपाताचे स्वरूप धारण केल्यामुळे आपल्या देशापुढे एक फार मोठी समस्या निर्माण झाली आहे.

### नक्षलवाद चळवळीचा आढावा

नक्षलवादी, नक्सल, नक्स लाईट या नावाने ही चळवळ ओळखली जाते. या चळवळीला आता दहशतवादी स्वरूप प्राप्त झाले आहेत. या नक्षलवादी संघटनेची स्थापना १९६७ साली बंगालमधील नक्सलबारी गावात झाली. २५ मे १९६७ रोजी एका तरूण शेतक-यांने न्यायालयातून आदेश आणूण आपल्या मालकीच्या जमिनीचा ताबा मिळवला. तो जमीन करण्यास शेतात गेला असताना त्यांच्यावर जमीनदाराने हल्ला करून त्याला जखमी केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून आदिवासी लोकांना जमीनदारांवर हल्ला करून आपल्या जमिनी परत मिळविल्या. तेंव्हापासून ही संघटना नक्षलवादी या नावाने ओळखले जाते. जनतेचा सशस्त्रा लढा उभारून व सशस्त्रा बंड करून जनतेचे राज्य स्थापन (People’s Government) करण्याचा या गटाचा निर्धार आहे. आदिवासी, भूमिहिन, शेतकरी, शेतमजूर व दलित जनतेचे आपण प्रतिनिधी आहोत असा त्यांचा दावा आहे.

नक्षलवादी, संघटना ही कम्युनिस्ट पक्षाचा क्रांतिकारक गट आहे. यात अनेक उपगट आहेत. चारू मुजूमदार आणि कनू संन्याल यांनी या चळवळीला जनतेच्या चळवळीचे स्वरूप आणून दिले. ते दोघेजण कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते. ते दोघेजण या पक्षातून बाहेर पडले व नक्षलवादी पक्षाची रितसर स्थापन केली व या पक्षाचे नेतृत्व केले. चारू मुजूमदारला चिनी नेता माओत्से तुंगची राजकीय विचारसरणी प्रिय होती. चारू मुजूमदारला असे वाटत होते की, भारतीय शोषित वर्ग, शेतकरी, आदिवासी शेतमजूर, दलित वर्ग यांनी माओचा मार्ग स्वीकारावा आणि उच्च वर्गाचे आणि त्यांच्या शासनाचे उच्चाटन करावे. कारण शेतक-यांच्या व आदिवासींच्या दुःखाला दारिद्र्याला तेच कारणीभूत आहेत. याकरीता लागणारे डावपेच म्हणजे गमिनी युद्ध लपून-छपून हल्ले करावे, चारू मुजूमदार याने मार्क्सवाद, लेनिनवाद या विषयांवर आठ लेख लिहिले तेच लेख नक्षलवादी चळवळीची मार्गदर्शक तत्त्वे मानली गेली.

१९६९ साली या चळवळीत कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्सवादी, लेनिनवादी या राजकीय पक्षांची स्थापना करण्यात आली. या पक्षात प्रमुख दोन गट आहेत. पीपल्स वॉर (P.W.G.) ग्रुप आणि माओवादी कम्युनिस्टट सेंटर (M.C.C.) भारताच्या ज्या राज्यात विकास अत्यंत कमी झाले आहे. अशा प्रदेशात नक्षलवादी गटांनी आपले बस्तान बसवले आहे. हे प्रदेश म्हणजे बिहार, झारखंड, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, पूर्व महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि ओरिसाचा पश्चिम भाग हे आहेत. या प्रदेशात सुमार १५६

 ©EIJMR, All rights reserved.

जिल्ह्यांत नक्षलवादी चळवळीने व हिंसाचाराने उच्चांक गाठला आहे. २००१ साली ९ नक्षलवादी राज्ये व श्रीलंका आणि नेपाळमधील नक्षलवादी गटांनी एकत्र येऊन एक मध्यवर्ती संघटना स्थापना केली आहे. दक्षिण आशियात नक्षलवादी चळवळीचा आणि तत्वज्ञानाचा प्रचार करण्याचा यापाठीमागचा उद्देश आहे.

काही मुख्य राज्यातील नक्षलवचदी हल्ले आणि चळवळीच्या घडामोडी

अनेक कारणांमुळे भारतीय कम्युनिस्ट पक्षात (C.P.I.M.L.) फाटाफुट झाली व त्यातून अनेक नक्षलवादी गट निर्माण झाले. हे गट वेगवेगळ्या राज्यात सक्रिय आहेत; परंतु शेतकरी आणि मजूर वर्गाचा सशस्त्रा संघर्ष हे ध्येय सर्व गटांचे समान आहेत.

### १) आंध्रप्रदेश

एकट्या आंध्रप्रदेशात दहा नक्षलवादी गट अस्तित्वात होते. चारू मुजूमदार यांचे कट्टर शिष्य कोंडापल्ली सीतारामय्य यांनी १९८० मध्ये 'पीपल्स वॉर ग्रुप' ची स्थापना केली व इतर नक्षलवादी गटांना निष्प्रभ करून सोडले. या ग्रुपने १९८४ ते १९८८ पर्यंत ३२ पोलीस अधिकारी कर्मचा-यांना ठार माले. डिसेंबर १९८७ ला ७ आय.एस.ए. अधिका-यांचे अपहरण करण्यात आले. त्या बदल्यात ८ तुरूंगातील नक्षलवाद्यांना सोडण्यात आले. नक्षलवादी हिंसाचारात आतापर्यंत ६०० पेक्षा जास्त माणसे मारली गेली आहेत. १९९२ पासून माओवादी गटांवर आंध्रप्रदेशात बंदी घालण्यात आली. माओवादी गट आणि आंध्रप्रदेश सरकार यांच्यात वाटाघाटी करण्यात आल्या तेव्हापासून काही प्रमाणात आंध्रप्रदेशात हिंस्रा स्वरूप कमी झाले.

### २) छत्तीसगड

छत्तीसगड या राज्याच्या सीमा मध्यप्रदेश, झारखंड, ओरिसा, कर्नाटक या राज्यांना लागून आहेत. हे आर्थिक दृष्टीने मागासलेले राज्य आहेत. डोंगराळ प्रदेशात, जंगल भागात अनेक आदिवासी आणि जन जातीचे वास्तव्य आढळते. त्यामुळे नक्षलवादी चळवळींना हा भाग अनुकूल असा आहे. त्यामुळे या राज्यात हिंसाचाराच्या घटना जास्त प्रमाणात दिसून येतात.

१. ०३/०९/२००५ मध्ये केंद्रीय राखीव पोलीस (C.R.P.F.) दलाचे २४ जवान कुंजीरनाला येथे मारले गेले.
२. २००५ जुलै आणि ऑगस्टमध्ये कॉग्रेस नेते श्री. महेंद्र कर्म यांच्या जवळच्या दोन नातेवाईकांसह ५० जणांची हत्या करण्यात आली.
३. २ जून २००५ राजी केंद्रीय राखीव दलाचे ५ जवान फडीगुंडा येथे ठार करण्यात आले.
४. २२ मे २००५ मध्येच के.रा. दलाचे ५ जवा भैरवगड येथे ठार करण्यात आले.
५. २० फेब्रुवारी २००२ मध्ये भू-सुरूंगाचा स्फोट करण्यात येऊन २३ पोलिसांना मारण्यात आले.
६. ८ फेब्रुवारी २००६ रोजी सुमारे ९०० नक्षलवाद्यांनी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा सैनिकांच्या तळावर हल्ला करून ८ जवानांना ठार केले आणि अनेक शस्त्रे लुटली.

### ३) झारखंड

गिरीध येथील पोलीस ट्रेनिंग सेंटवर दि. ११ नोव्हेंबर २००५ रोजी भयानक हल्ला करून १८६ रायफली, २००० बंदुकीच्या गोळ्यांची लूट केली. या लुटलेल्या शस्राचा उपयोग जहानाबाद येथील तुरूंगाबाद हल्ला करण्यासाठी केला. या हल्ल्यातून तुरुंगातील ३८९ जणांना पळवून नेले. त्यातील आपल्या नक्षवादी सहका-यांची सुटका केली. रणवीर सेनेच्या काही

 ©EIJMR, All rights reserved.

जणांना पळवून नेऊन त्यातील ९ जणांची हत्या केली.

### ४) ओरिसा

ओरिसातील उदयगिरा शहरात पहाटे साडेचारच्या सुमारास साधारण ४०० नक्षलवाद्यांनी फार मोठा हल्ला केला. हल्ल्यापुर्वी शहराच्या सर्व रस्त्यांची नाकेबंदी केली. ती सशस्त्रा पोलिसांना गोळ्या घालून ठार केले. दोन पोलीस अधिका-यांचे अपहरण केले. या धाडीत त्यांनी बरीच शस्त्रे आणि पैसा लुटला. तुरूंगावार हल्ला करून ४० कैद्यांची सुटका केली.

### ५) बिहार

गेले तीन दशके बिहार राज्य हे जातीय संघर्षाचे आगार बनले होते. आपले वर्चस्व कायम राखण्याकरीता उच्चवर्णीयांनी व जमीनदारांनी स्वतःच्या खाजगी सेभा उभारल्या होत्या. पोलीस खात्याबद्दल असंख्य तक्रारी होत्या. पोलीस खाते सर्वसामान्य माणसाला संरक्षण आणि सुरक्षा देऊ शकत नव्हते. देशातील सर्वात जास्त मनुष्य हत्या, अपहरणे, खंडणी वसुली, कस्टडीतील मृत्यू बिहारमध्ये आढळून येतात. अनेक प्रकरणात पोलिसांचे दादा लोक मवाली, सशस्त्र गुंड यांच्याबरोबर साटेलोटे निर्माण झालेले होते. या सर्व कारणांमुळे बिहारमध्ये खाजगी सेनाचे प्राबल्य निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीमुळे सामान्य जनता, दलित वर्ग, शेतकरी व शोषित वर्ग यांना पण आपापल्या खाजगी सेना उभ्या कराव्या लागल्या होत्या. एवढेच नव्हे तर गमिनी काव्याची पथके पण येथे उभारली गेली होती. नक्षलवादाचा अभ्यास करताना या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत.

बिहारमध्ये नक्षलवादी गटातील प्रमुख गट माओ इस्ट कम्युनिस्ट सेंटर (M.C.C.) यांची स्थापना बहारगोर या ठिकाणी १९७० साली झाली. लवकरच त्यांच्या कारवाया वाढत गेल्या; परंतु त्यावेळी सरकारणी त्यावर कठोर उपाययोजना करून त्यांचा काटा काढला. काहींना अटक करून तुरुंगात टाकले तर काहींना ठार केले. यानंतर त्यांच्या नेत्यांची आपला पवित्रा बदलून गया आणि औरंगाबाद जिल्ह्यात आपले बस्तान बसवले व तेथे तळ स्थापन केले आणि पुन्हा आपल्या कारवाया सुरू केल्या. १९८७ ला ४२ व्यक्तींची हत्या केली आणि १९९२ ला ३७ लोकांची हत्या केली. यानंतर M.C.C. गटाने जमीनदारांच्या, सावकारांच्या, नक्षली प्रतिपक्षीयांच्या घरांवर धाडी घालून लुटालूट, खंडणी वसुली, हिंसाचार हे प्रकार चालूच ठेवले. यामध्ये रणवीर सेना जमीनदाराने निर्माण केली होती आणि ती नक्षलीविरूद्ध उभी होती. त्यामुळे या दोन गटात हिंसाचार होत असे.

काही गटांना हा हिंसाचार पसंत नव्हता. उदा. आंध्रप्रदेशातील पीपल्स वॉर आणि माओवादी कम्युनिस्ट सेंटर (M.C.C.) यामध्ये वाद निर्माण झाले आणि एकमेकांच्या तळांवर आणि ठिकाणांवर हल्ले केले जाऊ लागले. १९९८ नंतर नक्षलवाद्यांचे जे अनेक लहान लहान नट होते त्यांच्यात पण ही सुंदोपसुंदी-यादवी सुरु झाली व कळसास पोहोचली. रक्तपात, हत्या, जाळपोळ, दहशत इत्यादी प्रकार चालूच राहिले व प्रतिस्पर्ध्यांच्या ठिकाणांवर हल्ले केले गेले. या पाठीमागे आपापल्या प्रदेशावर, भागावर स्वामित्व प्रस्थापित करणे हा प्रधान हेतू होता.

### नक्षलवाद्यांचे आर्थिक स्त्रोत

नक्षलवादी पैसा मिळविण्यासाठी सरकारी नोकर, भ्रष्ट अधिकारी, कंत्राटदार, व्यापारी, उद्योगपती, राजकीय पुढारी, धंदेवाईक, लाकडाचे व्यापारी, वनसंपत्ती चोर या सर्वांकडून रितसर हप्ते गोळा

 ©EIJMR, All rights reserved.

करून नक्षलवादी गटांची आर्थिक गरज निभावली जाते. ओरिसा, आंध्र प्रदेश व बिहारच्या काही भागात तेंदूपत्ता कंत्राटदारांकडून कमिशन हडप करून पैसा गोळा केला जातो. बिहार, छत्तीसगड, झारखंड या राज्यात खनिजांच्या खाणी आहेत. यातूनदेखील कमिशन नक्षलवादी गटांना सहजपणे मिळते. त्याशिवाय या भागात विकास योजनेकरिता आलेला निधी उदा. रोजगार योजना या निधीवर नक्षलवादी गटाचीच मक्तेदारी असे. असे म्हणता येईल की, नक्षलवादी गटांचे समांतर शासन होते. नक्षलवादी गटामध्ये केवळ विचारसरणीत मतभिन्नता होती म्हणून त्यांच्यामध्ये हिंसाचार चालू होत असे नव्हते तर पैसा, संपत्ती याकरिता सुद्धा होते.

**निष्कर्ष**

वेगवेगळ्या राज्यातील नक्षलग्रस्त भाग आणि भाग आणि आकडेवारी बघितली तर दिवसेंदिवस नक्षलवादी हिंसाचार वाढतच असून केंद्र व राज्य सरकारपुढे नक्षलवाद हे फार मोठे आवाहन उभे टाकले आहे. यावर नियंत्रण ठेवण्यास राज्य व केंद्र सरकार अपयशी ठरत आहेत. भारताच्या सतरा राज्यांमध्ये नक्षलवाद वाढलेला असून तो डोंगराळ द-यातील आदिवासी भूप्रदेशात नक्षलवादाचे जाळे दिसून येतात. एकंदर नक्षलवादाचा इतिहास बघितल्यास व त्या निर्मितीमागचा उद्देश बघितल्यास आपल्या देशामध्ये समाजवादी समाज रचनेचा अभाव दिसून येतो. गरीब-श्रीमंत यामधील दरी दिवसेंदिवस वाढत आहे. उच्चभ्रू, सत्ता आणि संपत्ती असलेले लोक गरीबी, दारिद्र्य, रोजमजुरी करणा-या लोकांवर अन्याय, अत्याचार करीत असल्याच्या विरूद्ध हिंस्त्र चळवळी निर्माण केल्या आहेत; परंतु नक्षलवादी गटांचा हा हिंसाचारी मार्ग आपल्या लोकशाही देशात चुकीचा आहे. यांच्या हिंसाचारी वृत्तीमुळे अनेक निरपराध लोक मारले गेले आहेत. या नक्षलवादी हिंसाचाराचा सगळ्यात जास्त आदिवासी लोकांना त्रास होत आहे. अनेक आदिवासी लोक यामध्ये मारले जात आहेत. त्यानंतर केंद्रीय राखीव पोलीस आणि राज्याचे पोलीस यामध्ये मारले जात आहेत. नक्षलवाद चळवळीत अनेक गट आहेत. त्यांच्या विचारातही भिन्नता दिसून येते ते आता स्वार्थी हेतूने कार्य करीत असल्याचे दिसून येते त्यांना सत्ता आणि संपत्ती मिळविण्याच्या उद्देशाने हिंसाचार घडवून आणत असल्याचे दिसून येते. शासनातील वाढतया भ्रष्टाचारामुळे दुर्गम आदिवासी भूप्रदेशात शासनाच्या कल्याणकारी योजना पोहोचत नसल्यामुळे आणि मूलभूत विकास होत नसल्यामुळे सुद्धा या चळवळीला त्या भागामध्ये तेथील लोकांचे सहकार्य मिळते. त्याची सहानुभूती मिळत असते. त्यामुळे या नक्षलवादी गटाचे जाळे पसरत आहे. शासन या भूप्रदेशातील विकास करण्यास अपयशी ठरत आहे. केंद्र आणि राज्य सरकारने यामध्ये नक्षलवादी नष्ट करण्यासाठी निश्चित असे धोरण नाही. त्यांच्यामध्ये समन्वय नाही.

**शिफारशी**

१. केंद्र आणि राज्य सरकारांनी नक्षलवादी गटांबरोबर चर्चा करून त्यांच्या मूळ समस्यांचा शोध घ्यावा.
२. शासनाने नक्षलग्रस्त भागात जाऊन तेथील लोकांच्या मूलभूत समस्या काय आहेत. त्या शोधून समस्यांचे निराकरण करावे.
३. नक्षलग्रस्त भागातील स्थानिक लोक नक्षलवादी गटांमध्ये भरती होणार नाहीत याची काळजी घ्यावी.
४. या भागातील लोकांना जास्तीत जास्त रोजगारांच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

५. नक्षलग्रस्त भूप्रदेशातील सगळ्यांना समान न्याय मिळेल या दृष्टीने प्रयत्न करणे.

६. राजकीय पंक्षानी जाती-जातीचे राजकारण थांबवावे. त्यांना कोणत्याही राजकीय पक्षाने अप्रत्यक्ष सहकार्य करू नये.

७. पोलीस यंत्रणा अत्याधुनिक केली पाहिजे.

८. नक्षलग्रस्त भूप्रदेशाध्यक्ष सामाजिक, आर्थिक मागासलेपणा दूर करून शिक्षण, आरोग्य, दळणवळणाच्या सुविधा पुरविल्या पाहिजेत.

९. दुरावस्था दुर्गम भागात सुद्धा पोलिसांची सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे.

१०. नक्षलवादी गटांना मिळणा-या पैशाचा व शस्त्राचा शोध घेऊन तो बंद केला पाहिजे.

## संदर्भ

१. एकविसाव्या शतकातील दहशतवाद, म.न. उदगावकर.

२. प्रतियोगिता दर्पण मासिक (२०१० ते २०१४)

३. वृत्तमानपत्रे

४. इलेक्ट्रॉनिक मीडिया

५. www.nashhawad.com

६. www.nashhalizam.com

७. Das S.T., (1998), 'Tribal Life at North Eastern India', Giah Publishing House, Delhi.

८. Majumdar D.N. & Madan T.N., (1963), 'An Introducation to Social Anthropology', Asia Publishing House, Bombay.